# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

परिपत्रक क्र. आस्था/आरओ/38/२०२५

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागात कंत्राटदार संस्थेमार्फत कार्यरत कुशल / अकुशल कंत्राटी कामगारांना कळविण्यात येते की, विद्यापीठास कंत्राटी तत्वावर कुशल / अकुशल कंत्राटी कामगार पुरविण्यासाठी नियुक्ती करण्यात आलेले कंत्राटदार मे. महाराणा एजन्सी सेक्युरिटी अॅण्ड लेबर सप्लायर, छत्रपती संभाजीनगर यांच्या कालावधीतील वेतन, पी.एफ., ई.एस.आय.सी. इ. बाबत कामगारांकडून तक्रारी मागविण्यात आल्या होत्या. काही कामगारांनी तक्रारी सादर केल्या आहेत. परंतु तक्रारीसोबत फक्त पी.एफ.च्या पासबूकची छायांकित प्रत जोडली आहे. त्यामध्ये वेतनाबाबत कोणतीही माहिती सादर केलेली नाही.

सर्व कामगारांना पुनःश्च कळविण्यात येते की, त्यांनी तक्रारी सादर करतांना वेतन, पी.एफ., ई.एस.आय.सी. कमी मिळाले / मिळाले नाही याबाबत स्पष्ट तक्रार खालील तक्त्यात महिनानिहाय सादर करावी (सोबत पुरावा सादर करावा).

| अ. क्र. | महिना | मिळालेले वेतन | वेतनात फरक असल्यास रक्कम नमूद करावी | पी.एफ. | पीएफच्या रक्कमेत फरक असल्यास रक्कम नमूद करावी | ई.एस. आय.सी. | ईएसआयसीच्या रक्कमेतफरक असल्यास रक्कम नमूद करावी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नोव्हेंबर-२०२४ | | | | | | |
| ०२ | डिसेंबर-२०२४ | | | | | | |
| ०३ | जानेवारी-२०२५ | | | | | | |
| ०४ | फेब्रुवारी-२०२५ | | | | | | |
| ०५ | मार्च-२०२५ | | | | | | |
| ०६ | एप्रिल-२०२५ | | | | | | |

सबब, या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागात कंत्राटदार मे. महाराणा एजन्सी सेक्युरिटी ॲण्ड लेबर सप्लायर, छत्रपती संभाजीनगर या संस्थेमार्फत कार्यरत सर्व कुशल आणि अकुशल कंत्राटी कामगार यांना कळविण्यात येते की, उपरोक्तप्रमाणे माहिती दि. १२-१२-२०२५ पर्यंत लेखी तक्रार सादर करावी. तक्रारीसोबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रती सादर कराव्यात. अर्जासोबत कोणताही पुरावा जोडला नाहीतर सदर अर्जाची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक विभागातील सर्व कंत्राटी कामगारांच्या निदर्शनास आणून द्यावे.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )(
संदर्भ :- आस्था/आरओ/२०२५/--38 )(
दिनांक : ०८-१२-२०२५ )(

कुलसचिव

**या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव:-**

१) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव.

२) सर्व संचालक/विभागप्रमुख, शैक्षणिक व प्रशासकीय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

३) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावे.

४) प्राचार्य, मॉडेल कॉलेज घनसावंगी, जि. जालना.

*****